स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत लोकप्रशासन विषयातील

पीएच.डी. पदवीसाठी संशोधनाचा संक्षिप्त आराखडा.

-: संशोधनाचा विषय :-

शिवकालीन प्रशासन - एक अभ्यास

‡.ÃÖ. 1630 ŸÖ 1680

संशोधक

लखपत्रेवार सुभाष गणपतराव

एम.ए.एम.एड., एम.फिल.(लोकप्रशासन)

subhashlakhpatrewar@gmail.com

´ÖÖ.9860185752

संशोधन मार्गदर्शक

डॉ.अशोक वाकोडकर

संशोधन मार्गदर्शक केंद्र,

लोकप्रशासन विभाग

देगलूर महाविद्यालय, देगलूर

संशोधनाचा विषय

"शिवकालीन प्रशासन - एक अभ्यास"

प्रस्तावना :

या भारत भूमिने जगाला अनेक महापुरुष दिलेले आहेत. ज्यांनी जगावरच नव्हे तर जनतेच्या मनांवर, -हदयांवर राज्य केले अशा महापुरुषापैकी एक म्हणजे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, महाधुरंधर, तेजप्रताप पुरंदर, क्षेत्रिय कुलवंत, श्रीमान योगी, श्री छत्रपती शिवाजी महाराज होत.

शिवपूर्वकाळात महाराष्ट्रात अराजक व गोंधळाची परिस्थिती होती. अशा परिस्थितीवर मात करुन छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली आणि पूर्वीच्या प्रशासनातील दोष बाजूला सारुन आपल्या प्रशासनात त्यांनी आमूलाग्र बदल केले. केंद्रीय सत्ता दुबळी असेल तर लष्करी आणि मुलकी प्रशासनात दोष निर्माण होतात याची स्पष्ट कल्पना महाराजांना होती म्हणून त्यांनी केंद्रीय सत्ता सार्वभौम बनवली.

छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, उत्कृष्ट प्रशासक आणि असामान्य पराक्रम गाजवणारे नेतृत्व होते. त्यांच्या काळातील प्रशासन व्यवस्थेत विविध जनकल्याणाची कामे करतांना सामान्यातील सामान्य माणूस केंद्र बिंदू मानून प्रशासन चालविले जात होते. राज्याचा कारभार अधिकाधिक कार्यक्षम व पारदर्शक बनविण्यासाठी शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळ स्थापन केले होते. या अष्टप्रधान मंडळाचे मूळ प्राचीन भारतातील रामायण, महाभारत यासारख्या ऐतिहासिक ग्रंथात देखील दिसून येते.

शिवाजी महाराजांच्या पूर्वी महसूल गोळा करण्याचे काम जमिनदारांकडे होते. जमीनदार वर्ग बहुतेक वेळा महसूल गोळा करीत असतांना जनतेवर अन्याय, अत्याचार करीत असे. जनतेवर अन्याय अत्याचार करणारी ही जमीनदारी पध्दत महाराजांनी रद्द केली. दलालांचे अधिकार काढून घेतले व आदर्श अशी रयतवारी पध्दती सुरु केली, आणि महसूल गोळा करण्यासाठी स्वत:चे (सरकारी) अधिकारी नियुक्त केले व सेवकापासून ते मंत्र्यापर्यंत सर्वांना मासिक वेतन (पगार) चालू केले. महाराजांची शेतक-यांविषयी नितांत आस्था ÆÖÝÖß. **"शेतक-यांच्या भाजीच्या देठालाही हात लावला, तर हात कलम केले •ÖÖÝÖß»Ö"** अशी सक्त ताकीद त्यांनी वसूली अधिका-यांना दिली होती. इतकेच नव्हे तर दुष्काळी काळात शेतक-यांचा शेतसारा माफ करुन त्यांना हवी ते मदत सरकारी खजिन्यातून करण्याचे आदेश दिले जात असत.

शिवकालीन प्रशासनातील न्यायव्यवस्था आदर्श स्वरुपाची होती. महाराजांनी न्यायाधीश हे स्वतंत्र पद निर्माण करुन त्यांना मंत्रीमंडळात स्थान दिले होते आणि नि:पक्षपाती न्यायदान करण्यासाठी न्यायाधीशास पुरेसे अधिकार प्रदान केलेले दिसून येतात. आजच्या न्याय प्रशासनातील "लोकन्यायालय" या संकल्पनेचे मूळ शिवकालीन प्रशासनात दिसून येते.

एक आदर्श प्रशासन यंत्रणा निर्माण करणारे आदर्श प्रशासक, स्वराज्यातून सुराज्य निर्माण करणारे सुराज्यकर्ते, सर्वप्रथम लोकशाही तत्वाला अनुसरुन प्रशासन यंत्रणा उभारणारे लोकोत्तर राजे, आजच्या लोक कल्याणकारी राज्याचे आरंभकर्ता जाणता राजा, एक युगकर्ता, युगप्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विविध पैलूंचा अभ्यास सामाजिक शास्त्रांमध्ये केला जातो. एक आदर्श प्रशासक म्हणून महाराजांचे प्रशासन कसे होते याचा अभ्यास करण्यासाठी, मी लोकप्रशासनाचा एक विद्यार्थी एक अभ्यासक या नात्याने, **"शिवकालिन प्रशासन एक अभ्यास"** हा विषय संशोधनासाठी निवडला आहे. हया विषयावर मी माझा शोध प्रबंध सादर करणार आहे.

<u>संशोधनाचा उद्देश :-</u>

1) एक आदर्श प्रशासक या दृष्टीकोनातून छ. शिवाजी महाराजांच्या व्यक्तीमत्वामध्ये असलेल्या विविध पैलुंचा अभ्यास करणे.

2) राज्यकारभार सुरळीतपणे चालविण्यासाठी शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या अष्टप्रधान मंडळाची रचना, अधिकार, कार्ये व कार्यपध्दती यांचा सखोल अभ्यास करणे.

3) शिवाजी महाराजांनी महसूल प्रशासनातील जमीनदारी पध्दत नष्ट करुन स्थापना केलेल्या रयतवारी पध्दतीचा अभ्यास करणे.

4) शिवकाळातील न्याय व्यवस्थेचा अभ्यास करणे, तत्कालीन दिवाणी व फौजदारी खटल्यासंदर्भात न्यायदान करण्याच्या पध्दतीचा अभ्यास करणे.

5) छ. शिवाजी महाराजांच्या काळातील सामाजिक, आर्थिक, राजकीय तसेच प्रशासकीय व्यवस्था जाणून घेणे.

6) अष्टप्रधान मंडळातील अमात्यांना (मंत्र्यांना) मार्गदर्शन करण्यासाठी महाराजांनी पाठविलेल्या आज्ञापत्रांचा अभ्यास करणे.

7) प्रशासनातील लोकसहभाग वाढविण्यासाठी शिवाजी महाराजांनी केलेल्या विविध उपाययोजनांचा शोध घेणे.

गृहितकृत्ये :-

1) अ) शिवाजी महाराजांच्या काळात महिलांना समाजात सन्मानाची वागणूक x´ÖôÖlÝÖ ÆÖÝÖß.

ब) तत्कालीन प्रशासन व्यवस्थेत महिलांना स्थान नव्हते.

2) प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेत (ग्रामीण व नागरी) शिवाजी महाराजांनी आवश्यकतेनुसार बदल केला.

3) महाराजांच्या काळातील न्यायव्यवस्थाप नि:पक्षपाती व पारदर्शी स्वरुपाची ÆÖŸÖß.

4) छ. शिवाजी महाराजांचा राज्यकारभार सर्वसामान्य माणसांना केंद्रबिंदू मानून चालत होता.

5) छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील अधिकारी वर्ग जनहिताला प्राधान्य देणारा होता.

6) गुन्हेगारी व भ्रष्टाचारी वृत्तीवर कठोर नियंत्रण होते.

7) शिवकालीन प्रशासनात सर्व जाती धर्माच्या लोकांना स्थान होते.

8) सर्वसामान्यामध्ये आत्मविश्वास व आपलेपणाची भावना निर्माण करणारे शासन होते.

9) प्रशासनातील रिक्त पदाची भरती करतांना "गुणवत्ता" हाच एकमेव निकष ÆÖŸÖÖ

10) राजेशाही असूनही तत्कालीन प्रशासन हे लोकशाही तत्वानुसारच चालत ÆÖŸÖÖ.

संशोधनाची व्याप्ती :-

प्रस्तुत शोधप्रबंधाची व्याप्ती इ.स. १६२७/१६३० ते १६८० या कालखंडापर्यत †ÖÆê.

-: प्रकरण क्रमणिका :-

1)	प्रकरण पहिले	:	×¾ÖÂÖµÖ ¯Ö¾Ö¿Ö प्रस्तावना, संशोधनाचा उद्देश, गृहितकृत्ये, संशोधनाची व्याप्ती, पूर्वसाहित्याचा आढावा
2)	प्रकरण दुसरे	:	शिवाजी महाराजांचा जीवन परिचय अ) कुशल संघटक ब) आदर्श प्रशासक क) गुणग्राहक राजा / प्रशासक
3)	प्रकरण तिसरे	:	शिवकालीन प्रशासनाची रचना व कार्य अ) महसुल व सैन्य प्रशासन, कारागृह व न्यायप्रशासन ब) अष्टप्रधान मंडळ क) शिवकालीन आज्ञापत्रे
4)	प्रकरण चौथे	:	किल्ल्यांचे प्रशासन
5)	प्रकरण पाचवे	:	निष्कर्ष व शिफारशी

:: संदर्भ ग्रंथ सुची ::

1) **Administrative System of the Maratha's- S.N. Sen**

2) **Shivchhatrapati - Ek Study - Madhavrao Pagadi**

3) **Shivaji Rajniti - B.V. Bhat**

4) **Marathi Sattecha Utkarsha - N.R.Pathak**

5) **Raja Shivchhatrapati - Babasaheb Purandare**

6) **युगप्रवर्तक शिवाजी महाराज - व्ही.के. भावे**

7) **श्रीमान योगी - ¸|•ÖßŸÖ ¤ÃÖÖ‡**

8) **स्वराज्याची घटना - नाथमाधव**

संशोधक

लखपत्रेवार सुभाष गणपतराव
एम.ए.एम.एड., एम.फिल.(लोकप्रशासन)
subhashlakhpatrewar@gmail.com
´ÖÖ.9860185752

संशोधन मार्गदर्शक

डॉ.अशोक वाकोडकर
संशोधन मार्गदर्शक केंद्र
लोकप्रशासन विभाग
देगलूर महाविद्यालय, देगलूर

दिनांक :-   /   /२०१७

¯ÖÏŸÖ,

मा.संचालक,

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,

नांदेड.

विषय :- (पीएच.डी.) संशोधन आराखडा स्विकारणे बाबत.

संदर्भ :- गाईड अलोकेशन दि.१९.०५.२०१७

´ÖÆüÖ¤üµÖ,

वरील विषयास अनुसरुन विनंती करण्यात येते की, लखपत्रेवार सुभाष गणपतराव हे माझ्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. पदवीसाठी संशोधन कार्य करु ‡Ô“”ÖŸÖÖŸÖ ŸÖµÖÖ“Ö ×¾ÖÂÖµÖ **"शिवकालीन प्रशासन - एक अभ्यास"** हा असून प्रस्तुत विषयावर संशोधन करण्यासाठी ते संशोधन आराखडा सादर करीत आहेत.

कृपया तो स्वीकारुन सहकार्य करावे ही नम्र विनंती.

†Ö¯Ö»ÖÖ ×¾ÖÀ¾ÖÖÃÖ

डॉ.अशोक वाकोडकर

संशोधन मार्गदर्शक केंद्र

लोकप्रशासन विभाग

देगलूर महाविद्यालय, देगलूर